Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCXCI )291(H)

April -2021

## Women's Empowerment Issues and Challenges



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr. Bharat Bhadade**
Head, Department Of Marathi
Mahatma Phule Mahavidyalaya Kingaon,
Latur, Maharashtra

**Editor**
**Asst. Prof. Baliram Pawar**
Head, Department of Sociology
Mahatma Phule Mahavidyalaya Kingaon
Latur Maharashtra

**Editor**
Dr. Prakarsh Subhashrao Deshmukh
Associate Professor and Head,
Dept. Of Sociology.
Bhai Kishanrao Deshmukh Mahavidyalaya
Chakur. Ta. Chakur Dist. Latur.

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar Publication**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## April -2021

**ISSUE No- 291 (CCXCI) H**

# Women's Empowerment Issues And Challenges

**Chief Editor**
**Prof. Virag.S.Gawande**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Editor**
**Dr. Bharat Bhadade**
**Head, Department Of Marathi**
**Mahatma Phule Mahavidyalaya Kingaon, Latur, Maharashtra**

**Asst. Prof. Baliram Pawar**
**Head, Department Of Sociology**
**Mahatma Phule Mahavidyalaya Kingaon Latur Maharashtra**

**Dr. Prakarsh Subhashrao Deshmukh**
**Associate Professor and Head, Dept. Of Sociology.**
**Bhai Kishanrao Deshmukh Mahavidyalaya Chakur. Ta. Chakur Dist. Latur.**

## Aadhar International Publication

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

© **All rights reserved with the authors & publisher**

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola**.**
- **Prof.Dr. Shabab Rizvi ,**Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responisible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- **Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication ,**Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278 /

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Role Of Micro Finance In Women Empowerment Through Self Help Groups **Dr. Raj Soshte** | 1 |
| 2 | Issue Concernin Women's Live Sat Home And In The Society. Women Social Problem **Mridulav.S.** | 5 |
| 3 | A Sociological Study On Role Of Women Right In Women Empowerment **Monika Singh** | 8 |
| 4 | Major Problems of Older Women in India: An Analysis **Dr Aparajita Dutta /Anthony Toppo** | 12 |
| 5 | Problems Faced By Female Domestic Helpers During Covid-19 Lockdown **Sarbani Maity** | 16 |
| 6 | Access Technology For Rural Area Women's In India **Mrs. Reshma Ramdas Nitnaware** | 19 |
| 7 | Women's Role In Panchayiti Raj System **Mr. Uday Modak** | 23 |
| 8 | Rural Elderly Women's Experiences Of Special Challenges During Covid – 19 Pandemic: A Study Invillages Under Khap Khopraha Panchayat Of Bihar **Mr.Anupam Debnath /Mr. Mithun Mondal** | 27 |
| 9 | Education And Women Empowerment: The Challenges Of Marginal Communities Women In India **Birendri** | 31 |
| 10 | Empowerment Of Women **Somanakatti Bhimavati** | 36 |
| 11 | With Wings, Not To Fly But To Shelter:Analysing Women Around The Disabled In Select Malayalam Narratives **Sayoojya C. S.** | 38 |
| 12 | Women's Empowerment And Their Empowering Schemes In India With Special Reference To Assam **Mr.Tranjit Saikia** | 43 |
| 13 | Major Issues In Women Empowerment In Economic Development **Dr.Sreene Naik R** | 47 |
| 14 | Analytical study on the Role of Yoga in Managing Post COVID-19 Stress, Anxiety and Depression **Dr. Jyoti Motiram Gaikwad** | 51 |
| 15 | Mieke Bal's Theory Of Narratology Introduction To The Theory Of Narrativein Satyajit Ray's A Killer In Kailash **Somuse Anant Janardhan** | 56 |
| 16 | Women Artists and Environmental Issues: A study **Binoy Paul** | 60 |
| 17 | Women Empowerment Through **Entrepreneurship** In India **Dr. Deepika Mehera** | 64 |
| 18 | Women And Political Participation In India **Shobha S. Kanni** | 67 |
| 19 | Simone De Beauvoir's Feminist Account Of Love, Marriage And Sex **Ms Simmin Bawa** | 71 |
| 20 | Women Empowerment And Economic Development **M.Harita** | 77 |
| 21 | Importance And Utilization Of Academic Libraries **Deepak kumar** | 81 |
| 22 | Vital role Of Woman In Environmental Movements Of India. **Dr.Archana S.Chikhalikar** | 84 |

| | | |
|---|---|---|
| 23 | Gender Discrimination In Sports **Dr.S.Saroja / Mrs.S.Anbu Nisha Jeba Soundar** | 88 |
| 24 | Legal Rights & Protection To Working Women **Dr. Rahul Tiwari** | 90 |
| 25 | Mgnrega And Women Employment In Assam: Issues And Challenges **Sarah Tahmeen Choudhury** | 94 |
| 26 | Women Empowerment In Indian Society: Challenges And Opportunities **Milind R. Ghate** | 99 |
| 27 | Perspectives Of In-Service Teachers On The Role Of Education In Achieving Gender Equality **Dr Sharmila L Mascarenhas** | 102 |
| 28 | Status Scenario: Rights Of Girl Child In India **Monika** | 107 |
| 29 | Women Empowerment And Government Schemes **Dr Swati Yadav** | 110 |
| 30 | Women Wronged In Bollywood **Dr.Kalpana Sharma /Dr.Y. K. Sharma** | 114 |
| 31 | Strategies For making Women Empowered Through Entrepreneurship **Dr. Manjusha Saijare** | 118 |
| 32 | A Journey Towards Self – Reliance: Status Of Women Then And Now **Dr. Monika Malhotra** | 123 |
| 33 | The Impact of Media on Indian Women – A Critical Perspective **Dr. P. Sathya** | 127 |
| 34 | स्त्री स्वातंत्र्य:समानता व असमानता एक अवलोकन डॉ.देवमन श्रीक्रुष्ण उंबरकर | 131 |
| 35 | महिलाएं, स्वास्थ्य एवं मानवाधिकार : एक समाशास्त्रीय अध्ययन खुशबू एवं बेबी कुमारी | 137 |
| 36 | आदिवासी महिला आणि सक्षमीकरण आनंद धोंडीबा घोडवाडीकर | 141 |
| 37 | औपन्यासिक संदर्भ में – स्त्री का, स्त्री के लिए, स्त्री द्वारा विमर्श डॉ०मोक्षदा जौहरी | 146 |
| 38 | महिला सशक्तीकरण आणि मेघालयातील मातृसत्ताक कुटूंब पध्दती प्रा.डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव | 151 |
| 39 | महिला सक्षमीकरणांत शिक्षणाची भूमिका प्रा.डॉ.विद्या खंडारे–गोवंदे | 156 |
| 40 | महिला सक्षमीकरण आणि शासनाच्या विविध योजना शेख महेमुद शेख हलिम | 159 |
| 41 | महिलांचा राजकीय सहभाग **Dr.Wakradkar Mahesh R** | 165 |
| 42 | भारत में महिला सशक्तिकरण का मूल्यांकन डॉ.योगेन्द्र कुमार | 169 |
| 43 | लिंगभेद : एक सामाजिक समस्या प्रा.प्रीती सुखदेव वाहने | 173 |

| | | |
|---|---|---|
| 44 | हिंदी कहानियों में नारी विषयक चिंतन के विविध पक्ष **सौरभ सराफ** | 177 |
| 45 | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम (२००५) : एक अभ्यास **राजकुमार विष्णू जोंधळे** | 181 |
| 46 | ग्रामीण महिलांच्या आरोग्य विषयक समस्या:एक अध्ययन. डॉ. बालासाहेब शिवाजी पवार | 183 |
| 47 | Women's Role In Environmental Movements In India **Pawan Kumar Srivastava** | 188 |
| 48 | Suffocation of Women After Marital life in Anita Desai's *Cry, the Peacock* and Shashi Deshpande's *that long Silence* **M .Harini** | 194 |
| 49 | Double Marginalization of Women in A Raisin in the Sun by Lorraine Hansberry **Susmitha Sharu. R, / Dr.R.Abilasha** | 197 |
| 50 | Indigenous Healing System Among The Mishings Of Dibrugarh District, Assam **Biplob Bhuyan** | 200 |
| 51 | उदरमतवाद– भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सामर्थ्य प्रा.डॉ.सुपेकर वैशाली प्रशांत | 206 |
| 52 | महिला सक्षमीकरण व घटनात्मक तरतुदी प्रा. अमिता कृ. महातळे (विरूटकर) | 209 |
| 53 | ग्रामीण समुदायातील स्त्रीयांच्या समस्या आणि उपाय **प्रा.डॉ. भगवान डोंगरे** | 212 |
| 54 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळ **डॉ. सीता ल.केंद्रे** | 216 |
| 55 | नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांचे अध्ययन कु. सुनिता गजभिये | 219 |
| 56 | अदिवासी समाज में महिलाओं की स्थिति प्रा. डॉ. शेख शहेनाज अहेमद | 223 |
| 57 | भारतीय महिलाओं का विविध क्षेत्रों में योगदान एवं सशक्त भूमिका डॉ. वंदना हिमांशु जामकर | 226 |
| 58 | शिक्षकों की शिक्षण अभिवृत्ति और व्यावसायिक संतुष्टि का अध्ययन छत्तीसगढ के बस्तर जिले के संर्दभ में रीता शुक्ला | 229 |
| 59 | Covid १९ चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील, परिणाम डॉ सीमा रवींद्र चव्हाण | 236 |
| 61 | गांधी विचार एवं जैन दर्शन में महिला सशक्तिकरण की भूमिका: एक अवलोकन लालबिहारी कुशवाहा | 240 |
| 62 | भारतीय अर्थव्यवस्था में महिलाओं की भूमिका शुभम अ. महाजन. | 246 |
| 63 | स्त्रीवादी साहित्याचे बदलते स्वरुप प्रा.डॉ.संतोष चंपती हंकारे | 251 |
| 64 | Muslim Women Empowerment And Social Development Through Education **Dr. Nazhath Sara** | 256 |
| 65 | महिला आरक्षण - एक अध्ययन डॉ. अतुल एन. खोटे | 260 |
| 66 | माध्यमिक स्तर पर गणित शिक्षण की उपलब्धिया निष्कर्ष एवं सुझाव सुनील कुमार शर्मा | 263 |
| 67 | बहिणाबाई चौधरी यांची कविता आणि महिला सक्षमीकरण डॉ. विष्णू नामदेव लांडे | 269 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 291 (CCXCI) H

ISSN : 2278-9308
April, 2021

# उदरमतवाद- भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सामर्थ्य

प्रा.डॉ.सुपेकर वैशाली प्रशांत

विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर

मेल आय डी.-vaishalisupekar12@gmail.comMob-9822853058

प्रस्तावना-

गेले काही महिने कोविड महासाथीमुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी जागतिक स्तरावर होत असेलेले सहकार्य, लडाखमध्ये चीनबरोबर नव्याने उसळलेला संघर्ष, चीनला अटकाव करण्यासाठी 'क्वाड' गटाच्या स्थापनेला आलेला वेग, अमेरिकेशी भारताने केलेला 'बेका' करार, अमेरिकेत नुकत्याच पार पडलेल्या अध्यक्षीय निवडणुकीत जोसेफ बायडन यांचा झालेला विजय यासह अन्य काही घडामोडींमुळे आंतरराष्ट्रीय संबंधांची मोठ्या प्रमाणावर चर्चा होताना दिसते. कोविडचा उगम चीनमधून झाला आणि त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी चीनने वेळीच पावले उचलली नाहीत. तसेच या संकटाचा लाभ उठवत चीन भारतासह अनेक शेजारी देशांशी असलेल्या सीमावादांमध्ये आक्रमक भूमिका घेताना दिसत आहे. परिणामस्वरूप जागतिक जनमत सध्या चीनच्या विरोधात गेले आहे. चीनचे वर्तन सुधारण्यासाठी किंवा त्याला धडा शिकवण्यासाठी जग नवीन मांडणी करत आहे.1( २८ फेब्रुवारी२०२०.)आगामी जागतिक संरचनेत भारताला अधिक व्यापक भूमिका वठवण्याची संधी प्राप्त होत आहे. त्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय व्यवहारात भारताने आजवर केलेल्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेणे उद्बोधक ठरू शकते. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये १९९०-९१ नंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात होत असलेला बदल याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर जग अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्या गटांत विभागले जाऊन शीतयुद्ध सुरू झाले. मात्र भारताला यातील एकाही गटात सामील न करता आपले स्वतंत्र धोरण राबवण्याचा नेहरूंनी प्रयत्न केला. त्यासाठी युगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो आणि इजिप्तचे गमाल अब्देल नासेर यांच्या मदतीने अलिप्त देशांच्या चळवळीची (नॉन-अलाइन्ड मुव्हमेंट – 'नाम') स्थापना केली.2 (२३ ऑक्टोबर २०१५.)पण भारत कधीही हा अलिप्तवाद प्रत्यक्ष अंमलात आणू शकलेला नाही. स्वातंत्र्यानंतरची काही वर्षे भारत ब्रिटनवर शस्त्रास्त्रांसाठी अवलंबून होता. चीनने १९६२ साली आक्रमण केल्यावर भारताने अमेरिकेकडे लष्करी मदतीची याचना केली. पण अमेरिकेकडून तितकासा प्रतिसाद मिळाला नाही. अमेरिकेकडून भारताला जी काही तुटपुंजी लष्करी मदत होती ती १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर थांबली. चिनी आक्रमणानंतर देश खडबडून जागा झाला.3(४ एप्रिल २०१९.) नेहरू विश्वासघाताच्या भावनेने खचले. त्यांचे १९६४ साली निधन झाले. त्यानंतर पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची कारकीर्द अल्पजीवी ठरली.त्यानंतर पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी यांनी १९७१ साली रशियाशी २० वर्ष मैत्रीचा करार केला.आणि भारताला लष्करी मदतीचा ओघ सुरू झाला.यामुळे भारतीय सैन्य दलाला नवा जोर चढला होता.यादरम्यान भारतीय परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत एक बाब सांगता येईल की, परराष्ट्र धोरणाबाबत आदर्शवाद कायम होता,परंतु अन्य देशांच्या कारभारात भारताने लक्ष घालण्यास सुरुवात केली जसे की,श्रीलंका-तामिळ संघर्ष,बांगलादेशाची निर्मिती असेल किंवा मालदिव मध्ये बंडाळी मोडण्यासाठी हवाईमार्गे सैन्य पाठवविले होते.4(4,May 2015.)

१९९१ नंतर रशियाचे विघटन झाल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणापुढे नवीन पेचप्रसंग निर्माण झाला. भारताने १९७१ साली रशियाच्या गटात जाणे आणि १९७४ साली अणुचाचणी घेणे अमेरिकेला रुचले नव्हते आणि त्यांनी लादलेले निर्बंध अद्याप पुरते हटले होते. रशियासारखा मित्र कोसळला होता. देशाची परकीय गंगाजळी संपत आल्याने नाईलाजास्तव १९९१ साली मिश्र अर्थव्यवस्था सोडून मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारावी लागली होती. खनिज तेलासाठी अवलंबून असलेल्या आखाती देशांत इराक-कुवेत युद्धामुळे अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत भारताला आधार वाटला तो आग्नेय आशियाई देशांचा. इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर आदी देश वेगाने प्रगती करत 'एशियन टायगर्स' म्हणून नाव कमावत होते. भारताने आपला रोख या देशांच्या 'आसिआन' या संघटनेकडे वळवला आणि 'लुक ईस्ट पॉलिसी' (पूर्वाभिमुख धोरण) राबवण्यास सुरुवात केली. गेल्या काही वर्षांत भारताचे परराष्ट्र धोरण काहीसे वास्तववादी होताना दिसते. इतकी वर्षे इस्रायलशी चांगले संबंध असूनही तेलपुरवठादार अरब देशांना नाखुश करावे लागू नये म्हणून भारताने इस्रायलच्या संबंधांना अधिकृत मान्यता दिली नव्हती. ती आता देण्यात आली. हे थोडे वास्तवात येण्याचे लक्षण. मात्र, परराष्ट्र धोरणातील कल्पनाविलास अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. अलिप्तवादाची जागा आता 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी'ने (व्यूहात्मक स्वायत्तता) घेतली आहे. म्हणजे सामरीक किंवा व्यूहात्मक निर्णय घेताना अन्य देशांचा दबाव येऊ न देता स्वायत्तपणे निर्णय घेणे. पण, देश जोपर्यंत आर्थिक, औद्योगिक, संरक्षण, संशोधन आणि ऊर्जा आदी क्षेत्रांत स्वयंपूर्ण बनत नाही, तोपर्यंत 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' या संकल्पनेला काही अर्थ नाही.

१९९१ च्या उदरीकरणानंतर भारताने आपल्या धोरणामध्ये वास्तविकतेचा स्वीकार केलेला दिसतो.आर्थिक व्यवस्थेला केंद्रबिंदु मानून परकीय देशांशी संबंध निर्माण केले गेले.भारताचा आर्थिक विकास आणि अंतर्गत सुरक्षा ही शेजारील राष्ट्रामध्ये असलेली स्थिरता,लोकशाही आणि त्यांच्या आर्थिक विकासशी निगडीत असते.भारताच्या सीमा ज्या राष्ट्रांना जोडलेल्या आहेत,त्यांच्या आर्थिक विकासामध्ये योगदान देणे,हे भारताचे धोरण आहे. परराष्ट्र धोरण हे मूलत: आर्थिक-व्यापारी आणि संरक्षणविषयक हितसंबंधांतून आकाराला येत असते. या दोन्ही आघाड्यांवर आज भारत निर्णायक वळणांवर उभा आहे. या संदर्भात भारत आता जे निर्णय घेतो त्यावर त्याचे बऱ्याच अंशी भवितव्य अवलंबून असणार आहे. तेव्हा, निर्णय घेताना तो विचारपूर्वक घेणे आणि एकदा निर्णय घेतला की, अनेक आघाड्यांवर युद्धपातळीवर कामाला लागणे, यावाचून गत्यंतर नाही. तसे करताना फुकाच्या आदर्शवादी संकल्पनांच्या जोखडातून देशाला बाहेर काढण्याबरोबरच वास्तवाची कास धरणे, ही मोठी आव्हाने असणार आहेत.5(,Nov.1,2017.)

भारताला आपल्या परराष्ट्रीय धोरणाचा विचार करताना चीनचे फार मोठे आव्हान असलेले दिसून येते, आंतरराष्ट्रीय स्तरावर राजकीय व आर्थिक प्रगतीसाठी भारत व चीन ही दोन मॉडेल्स नेहमीच समोर ठेवली जातात आणि त्यांची तुलना केली जाते. चीनने राजकीय क्षेत्रात कम्युनिस्ट पद्धतीची हुकूमशाही राबवून आर्थिक प्रगतीसाठी मार्केट इकॉनॉमीचा स्वीकार केला. गेल्या चाळीस वर्षांतील चीनच्या आर्थिक प्रगतीमुळे साऱ्या जगाचे डोळे दिपले आहेत. आर्थिक समृद्धीच्या मोबदल्यात राजकीय स्वातंत्र्य काढून घेतल्याने चिनी नागरिक कायमच सरकारच्या वेठीस बांधले गेले आहेत.6(WPW) याउलट, भारताने कायमच लोकशाही प्रणाली राबवून नागरिकांच्या मूलभूत हक्कांना प्राधान्य दिले आहे. आर्थिक आघाडीवर खाचखळगे आले, प्रगतीचा वेग मंद राहिला तरी चालेल; मात्र या देशातील लोकशाही, कायद्याचे राज्य, व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांचा संकोच होणार नाही याच दिशेने भारताची वाटचाल झालेली आहे. त्यामुळे अनेकांना भारताने लोकशाहीचा अतिरेक केलेला असून आपल्याकडेही हुकूमशाही असेल तरच चीनसारखी प्रगती साध्य करता येईल असे वाटते. यातला विरोधाभास असा आहे की, उदारमतवादी लोकशाही असलेला, व्यक्तिस्वातंत्र्य- माध्यमस्वातंत्र्य यांची जपणूक करणारा, सत्तेचे विकेंद्रीकरण करून आर्थिक प्रगती साधणारा भारत ही चीनची खरी डोकेदुखी आहे. भारत जितका अधिक लोकशाहीवादी व अधिक उदारमतवादी होत जाईल

तितके चीनसमोरचे आव्हान वाढत जाईल. लोकशाही प्रणाली राबवूनही भारत आर्थिक विकास साध्य करू शकला, तर त्यामुळे भारताचे मॉडेल हे चीनसाठी नेहमीच आव्हानात्मक व जगासाठी प्रेरणादायी ठरू शकते. याला ऐतिहासिक आधार शोधण्यासाठी फार मागे जाण्याची गरज नाही. या शतकाच्या पहिल्या दशकात जेव्हा भारताची वेगवान आर्थिक प्रगती चालू होती, तेव्हा साऱ्या जगाचे भारताकडे लक्ष लागलेले होते. त्या काळात कोट्यवधी लोकं दारिद्र्यरेषेच्या वर काढण्यात भारताला यश आले होते॰

समारोप -

संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करताना लक्ष नेहमी विचलित होते आणि दीर्घकालीन विचार मागे पडून 'आज आणि आता' काय होते आहे याकडे लक्ष वेधले जाते. मात्र अशाच काळात आपल्या 'फंडामेंटल्स'कडे लक्ष देण्याची गरज असते. आपल्यासाठी 'फंडामेंटल्स' काय आहेत, हे राज्यघटनेत आलेले आहेच. आजच्या काळात त्याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. ती 'फंडामेंटल्स' ही केवळ व्यवहार्य आहेत असे नव्हेत, तर चीनशी सामना करण्यासाठी आवश्यक अशा 'स्ट्रॅटेजी'चा उगमही त्यातूनच होतो. आज चीनचा सामना करताना अनेकांना असा प्रश्न पडतो की, एक राष्ट्र म्हणून नेमकी काय पावले उचलायला हवीत. त्यांना हे सांगता येईल की, चीनचे आव्हान हे मुख्यतः राजकीय स्वरूपाचे असून त्याचे उत्तर राजकीय स्वरूपातच देता येईल. म्हणजेच दीर्घकालीन आव्हानाचा विचार केल्यास, भारताने अधिकाधिक लोकशाहीवादी व उदारमतवादी होणे यातच चिनी समस्येचे उत्तर दडलेले आहे.परराष्ट्रीय धोरणाचे अधिकाधिक लोकशाहीकरण करून परराष्ट्र धोरणाची निर्णय-निर्मिती प्रक्रिया ही अधिक लोकशाही पद्धतीने होणे आवश्यक आहे.

संदर्भ-

१.शैलेन्द्र देवळाणकर- परराष्ट्रधोरणाची नवी परिणामे,२८ फेब्रुवारी२०२०.

२. स्वप्नील घांगले-महाराष्ट्र टाइम्स- परराष्ट्र धोरणाचा अभ्यास,२३ ऑक्टोबर २०१५.

३.शैलेन्द्र देवळाणकर-मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट्रधोरण व संरक्षण धोरण:उपलब्धी,विपुल,आव्हाने बाकी,दिशा ४ एप्रिल २०१९.

४. भगवान माने-चीनच्या परराष्ट्र धोरणातील स्थित्यतरे,Indian streams Research Journal,ISSN 2230-7850,Vol-5,Issue-4,May 2015.

५.Vikas Chandra-Modi Government and changing patterns in Indian Foreign Policy,Jadhvpur journal of International Relations, First published,Nov.1,2017.

६.- Parimal Das- India's Foreign Policy in a changing World, The economic weekly.